# 'स्वरचित' - काव्य स्पर्धा

- कवितेचे शीर्षक : - जीवनगाणे
- कवी / कवयित्रीचे नाव :- सौ. वैशाली माळी

जीवन म्हणजे सप्तसुरांचे सुरेल सुंदर गाणे,
सुखदुःखाच्या हिंदोळ्यावर झोके घेत रहाणे !

सूर हरवतो, पुन्हा गवसतो,टिपेस केंव्हा जातो,
सूर मिसळतो सुरात कोणी,ताल कुणाला देतो,
खुलवत जावे ज्याने त्याने गावे जल्लोषाने,
जीवन म्हणजे सप्तसुरांचे सुरेल सुंदर गाणे !

कालगतीचे राग निराळे...संघर्षाच्या ताना..
सुरावटींशी खेळत खेळत पुन्हा समेवर या ना,
फुलवत नेते आयुष्याला अनुरागाचे लेणे,
जीवन म्हणजे सप्तसुरांचे सुरेल सुंदर गाणे !

मुक्या जिवांच्या हुंकारातुन ऐकू सूर दिवाणे,
विश्वालाही व्यापुन उरते माणुसकीचे गाणे,
या गाण्याला ऐकत असतो जगदीश्वर प्रेमाने,
जीवन म्हणजे सप्तसुरांचे सुरेल सुंदर गाणे !

बेसुर गाणे,ठेका चुकणे, दुष्कर्माच्या भाळी,
अमृत गोडी जपती केवळ सत्कर्माच्या ओळी,
तव कर्माची सूत्रे होवुन घुमतिल नाद तराणे,
जीवन म्हणजे सप्तसुरांचे सुरेल सुंदर गाणे !

Arihant Music Therapy

# ‘स्वरचित’ - काव्य स्पर्धा

नकोस विसरू किमया सारी श्वासांची या असते,
रंगत जाते मैफिल अवचित पुढे भैरवी दिसते,
या जगण्यावर प्रेम करावे शतदा आनंदाने,
जीवन म्हणजे सप्तसुरांचे सुरेल सुंदर गाणे !

जीवन म्हणजे सप्तसुरांचे सुरेल सुंदर गाणे !

Anahat Music Therapy